N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** तोफखाना **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 7651 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/11/2020 01:48 बजे

**2. S.No. (अ.क्र.) Acts (अधिनियम)** **Sections (कलम)**

| S.No. | Acts | Sections |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

**1. Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 26/11/2020
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 26/11/2020
**Time From (वेळेपासून):** 17:33 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:50 बजे

**(b) Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
**Date (दिनांक ):** 27/11/2020 **Time (वेळ):** 01:20 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 003 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/11/2020 01:20 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 3 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** जिल्हा हिवताप कार्यालय , चितळेरोड अनगर ,अहमदनगर

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** सुदाम सावळेराम खरात

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1967 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

(h) **Address** (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | फ्लट नं 24,ओमकार कॉम्प्लेक्स ,ऐश्वर्या पंपाच्या मागे केशवनगर,संगमनेर ,संगमनेर शहर , अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | फ्लट नं 24,ओमकार कॉम्प्लेक्स ,ऐश्वर्या पंपाच्या मागे केशवनगर,संगमनेर ,संगमनेर शहर , अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रजनी रामदास खुणे | | | 1. निसार हॉस्पिटलजवळ सिव्हील हडक, अहमदनगर ,अहमदनगर ,तोफखाना, अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | सापळा कारवाई दरम्यान पंचासमक्ष स्वीकारलेली | 80,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे **एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 80,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण **क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी सुदाम सावळेराम खरात वय 53 वर्षे, धंदा नोकरी, आरोग्य सहायक, जिल्हा हिवताप कार्या.अ.नगर अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र तळेगांव दिघी ता.संगमनेर जिल्हा अहमदनगर राहाणार फलट नंबर 24, ओमकार कॉम्लेक्स, ऐश्वर्या पंपाच्या माठीमागे, केशवनगर ता. संगमनेर जिल्हा अहमदनगर. मो.नं.902160708समक्ष ला.प्र.वि. अहमदनगर कार्यालयात हजर राहुन फिर्यादी जबाब देतो कि, मी वरील ठिकाणी कुटुंबासह रहाण्यास असुन मी जिल्हा हिवताप कार्यालय,अ.नगर अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र तळेगांव दिघी ता.संगमनेर जिल्हा अहमदनगर येथे फेब्रुवारी 2017 पासुन आरोग्य सहायक या पदावर नेमणुकीस आहे.मी दिनांक 25/11/2020 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो,अहमदनगर कार्यालयात हजर होवुन पोलीस उप अधिक्षक श्री. खेडकर यांची भेट घेवुन त्यांना माझी लाच मागणी बाबतची तक्रार सांगितली. त्यात मी त्यांना माझे रूग्णतः कालावधीतील काढण्यात न आलेले वेतन फरक काढल्याचे मोबदल्यात माझेकडे लाचेची मागणी होत असले बाबत व संबंधीत लोकसेवक यांची दिनांक 26/11/2020 रोजी भेट घेणार असल्याचे सांगितले. त्यावेळी पोलीस उप अधिक्षक श्री. खेडकर यांनी आज दिनांक 26/11/2020 रोजी सकाळी 10.00 वा. त्यांचे कार्यालयात लाचेच्या रकमेसह हजर रहाणे बाबत सुचना दिली. त्याप्रमाणे मी आज रोजी त्यांच्या कार्यालयात हजर झालो. पोलीस उप अधिक्षक श्री. खेडकर यांनी माझी कार्यालयात हजर असलेले पंच साक्षीदार व स्टाफ यांच्याशी आपसात ओळख करून दिली. त्यानंतर पोउपअधि. श्री.खेडकर यांचे सुचने प्रमाणे पंचानी माझी तक्रार विचारता मी माझी तक्रार तोंडी कथन केली ती, मी दिनांक 01/09/2014 ते 16/01/2015 या कालावधीत आजारी असल्याने रूग्णतः रजेवर होतो. माझे रूग्णतः रजेच्या कालावधीतील वेतन काढण्यात आले नाही. ते वेतन मिळण्यासाठी मी मा.जिल्हा हिवताप अधिकारी जिल्हा हिवताप कार्यालय,अहमदनगर यांना विनंती अर्ज मागील वर्षात समक्ष भेटुन दिला. त्याप्रमाणे माझे वरील रूग्णताः कालावधील वेतन 1,39,000/- रूपये काढण्यात येवुन ते माझे एस.बी.आय. शाखा संगमनेर बन्केच्या खात्यावर दिनंाक 19/11/2020 रोजी जमा झाले आहे. मला काल दिनांक 25/11/2020 रोजी जिल्हा हिवताप अधिकारी अहमदनगर श्रीमती डॉ.रजनी खुणे यांनी त्यांचे कार्यालयात बोलावुन घेतले. त्याप्रमाणे मी त्याची काल दिनांक 25/11/2020 रोजी त्यांच्या कार्यालयात भेट घेतली. त्यावेळी श्रीमती डॉ. रजनी खुणे मडम यांनी मला माझे रूग्णतः कालावधील प्रलंबित वेतन बील काढले आहे. त्याच्या मोबदल्यात काढलेल्या एकुण बिलाच्या 60 टक्के प्रमाणे पैसे दया असे म्हणाले. मी त्यांना माझे वेतन बील आहे. 60 टक्के तुम्हाला दिल्यास मला काय रहाणार ? असे म्हणता, श्रीमती डॉ रजनी खुणे यांनी तुमचे बील यापुर्वि कोणीही काढले नाही. ते मी काढले आहे. त्यामुळे तुम्हाला 60 टक्के प्रमाणे मला पैसे दयावेच लागती नाही तर त्याचा तुम्हाला पुढे त्रास होईल. असे म्हणाल्या व मला उदया पैसे घेवुन या असे सांगितले आहे. श्रीमती खुणे यांनी माझे काढलेल्या वेतन बील 1,39,000/- रूपये च्या 60 टक्के म्हणजे 83,400/- रूपये ची मागणी ते बील

काढण्याच्या मोबदल्यात लाच म्हणुन केली आहे. मला श्रीमती डॉ. रजनी खुणे यांना लाच देण्याची ईच्छा नाही. मी आज श्रीमती खुणे यांची त्यांच्या कार्यालयात भेट घेणार आहे. त्यांनी माझेकडे बील काढण्याचे मोबदल्यात लाचेची मागणी केलयास त्यांच्याविरूध्द कायदेशिर कारवाई करावी. श्रीमती खुणे यांच्याशी आर्थिक देणे घेण्याचा अगर उधार उसणवारीचा व्यवहार नसुन भांडण तंटा नाही. अशी तक्रार सांगुन मी रूग्णतः कालावधीतील प्रलंबित वेतन काढणे बाबत दिलेल्या अर्जाची व कागदपत्राची झेरॉक्स प्रत हजर केली. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री. खेडकर यांनी दिले सुचेने प्रमाणे मी माझी वरील प्रमाणे तक्रार स्वहस्ताक्षरात लिहून दिली. त्यावर मी सही केली. त्यानतर पोलीस उप अधिक्षक श्री. खेडकर व दोन्ही पंचानी मी लिहून दिलेल्या तक्रारीवर सहया केल्या. त्यानंतर मी डॉ.श्रीमती खुणे यांचे विरूध्द नोंदविलेल्या लाचमागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. पोलीस उप अधिक्षक श्री. खेडकर यांनी लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याचा वापराबाबत व हाताळणीबाबत माहिती समजावून सांगितली. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री. खेडकर यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नविन मेमरीकार्ड घालून, व्हाईस रेकॉर्डर चालू करून, त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याची माझी व दोन्ही पंचाची खात्री करून दिली. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री. खेडकर यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 श्री. कांबळे यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री. खेडकर यांनी मला व पंच नं.1 श्री. कांबळे अशांना माझेकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन श्रीमती डॉ. रजनी खुणे यांची भेट घेण्यासाठी रवाना केले. त्याप्रमाणे मी पंच नं.1 श्री. कांबळे यांचेसह जावुन जिल्हा हिवताप अधिकारी, चितळे रोड अहमदनगर कार्यालयात जावून श्रीमती डॉ.रजनी खुणे यांची भेट घेतली. त्यावेळी डॉ श्रीमती रजनी खुणे यांनी माझेकडे पंच नं. 1 श्री. कांबळे यांचे समक्ष माझे काढलेल्या प्रलंबित वेतन बील 1,39,000/- रूपये च्या 60 टक्के एवढी रक्कम लाच म्हणुन मागणी केली. आमच्यात झालेले संभाषण व्हाईस रेकॉर्डमध्ये ध्वनीमुद्रीत झाले. ते ध्वनीमुद्रीत संभाषण पोउप अधि. श्री.खेडकर यांनी पंचासमक्ष ऐकुन पाहीले. त्यात मी सांगितलेल्या हकीगते प्रमाणे श्रीमती खुणे यांनी माझेकडे बिलाचे 60 टक्के रकमेची लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. त्याप्रमाणे श्रीमती खुणे यांचेविरूध्द लाचेचा सापळा आयोजित करण्याचे ठरले. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री. खेडकर यांनी मला डॉ श्रीमती रजनी खुणे यांना लाच म्हणुन देण्यासाठी लाचेची रक्कम हजर करणेबाबत कळविले असता मी माझेकडील 2000/- रू दराच्या 40 चलनी नोटा असे एकुण 80,000/- रूपये समक्ष हजर केले. त्यानंतर अँन्थ्रासिन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहीती देण्यात आली. मी हजर केलेल्या नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावली व सदरच्या नोटा एका पांढया रंगाच्या कागदी पाकीटा ठेवुन पाकीटाच्या बाहेरील दोन्ही बाजुन अँन्थ्रासिन पावडर लावुन ते पाकीट माझे पन्टच्या उजव्या खिष्यात ठेवुन दिली. तसेच त्यानंतर मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकाला सापळा कारवाई दरम्यान करावयाचे कारवाई बाबत सुचना देण्यात आल्या व सर्व कायदेषीर कारवाई करण्यात आली. त्याबाबतचा सविस्तर पंचनामा कार्यालयीन संगणकावर टंकलिखीत करण्यात आला. त्यानंतर मी श्रीमती खुणे हे कार्यालयात आहे अगर कसे ? या बाबत खात्री करता, ते मिटींगला गेल्याचे व सायंकाळी 5-00 वा. येणार असल्याचे समजुन आले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड घालुन ते चालु करून, व्हाईस रेकॉर्डसह मला मला व पंच नं.1 कांबळे यांना डॉ श्रीमती रजनी खुणे यांची भेट घेण्यासाठी जिल्हा हिवताप कार्यालय, चितळेरोड अहमदनगर येथे जाण्यासाठी 16-55 वा. माझे मो.सा. वरुन करून डॉ श्रीमती रजनी खुणे यांचे विरूध्द जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय अहमदनगर येथे लाचेचा सापळा लावला. त्यावेळी मी व पंच नं. 1 श्री. कांबळे असे डॉ.श्रीमती रजनी खुणे यांचे कबीन मध्ये जावुन त्यांची भेट घेवुन त्यांना माझे एक लाख एकोणचाळीस हजार बील होते असे सांगुन माझे पन्टचे उजवे खिश्यातील लाचेच्या नोटा असलेले पाकीट काढुन त्यांच्या समोर धरून साठ टक्के प्रमाणे ऐंशी हजार रूपये आहेत असे सांगितले असता, श्रीमती खुणे यांनी मला सदर लाचेचा नोटा असलेले पाकीट त्यांचे समोर असलेल्या टेबलावर ठेवणे बाबत हाताने ईशारा केला. त्याप्रमाणे मी लाचेच्या नोटांचे पाकीट त्यांचे समोर असलेल्या टेबलावर ठेवले व त्यांना मोजुन घ्या असे म्हणालो. तेव्हा श्रीमती खुणे मडम यांनी मला ठिक आहे असल काही कमी जास्त तर बोलुन घेईल तुम्हाला असे म्हणाल्या. मी त्यांना फक्त नजर मारून पहा, कमी नको असे म्हणता श्रीमती खुणे मडम यांनी ते पाकीट त्यांचे उजव्या हाताने उचलुन पाहुण टेबलावर ठेवले व तुम्ही जास्त नका बोलु असे म्हणाल्या. त्यानंतर मी मला ठरवुन दिलेला लाच स्विकारल्याचा पुर्व नियोजित इषारा 17-33 वा. सुमारास केला. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री.खेडकर व सापळा पथकाने लोकसेविका डॉ श्रीमती रजनी खुणे यांना रंगेहाथ पकडले. लाचेची रक्कम टेबलावरून हस्तगत करण्यात आली. त्यानंतर जिल्हा हिवताप अधिकारी यांचे कार्यालयात लोकसेवक डॉ श्रीमती रजनी खुणे यांची, माझी, पंच, सापळा पथकातील अधिकारी कर्मचारी यांच्या आवष्यक त्या तपासण्या करण्यात आल्या, त्यानंतर लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,अहमदनगर कार्यालय येथे येवून, पंचनाम्याचे पुढील कामकाज केले. तरी यातील लोकसेवीका डॉ.श्रीमती रजनी रामदास खुणे वय 57 वर्ष, धंदा नोकरी, जिल्हा हिवताप अधिकारी अहमदनगर हल्ली रा. श्री.हिंगणे यांचे घरात भाडयाने, निसार हॉस्पीटल जवळ, सिव्हील हाडको, अहमदनगर मुळ रा. ए-1501, कस्तुरी एपिटॉमी, वाकड जि.पुणे यांनी माझे दिनांक 01मी सुदाम सावळेराम खरात वय 53 वर्षे, धंदा नोकरी, आरोग्य सहायक, जिल्हा हिवताप कार्या.अ.नगर अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र तळेगांव दिघी ता.संगमनेर जिल्हा अहमदनगर राहाणार फलट नंबर 24, ओमकार कॉम्लेक्स, ऐश्वर्या पंपाच्या माठीमागे, केशवनगर ता. संगमनेर जिल्हा अहमदनगर. मो.नं. 902160708समक्ष ला.प्र.वि. अहमदनगर कार्यालयात हजर राहुन फिर्यादी जबाब देतो कि, मी वरील ठिकाणी कुटुंबासह रहाण्यास असुन मी जिल्हा हिवताप कार्यालय,अ.नगर अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र तळेगांव दिघी ता.संगमनेर जिल्हा अहमदनगर येथे फेब्रुवारी 2017 पासुन आरोग्य सहायक या पदावर नेमणुकीस आहे.मी दिनांक 25/11/2020 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो,अहमदनगर कार्यालयात हजर होवुन पोलीस उप अधिक्षक श्री. खेडकर यांची भेट घेवुन त्यांना माझी लाच मागणी बाबतची तक्रार सांगितली. त्यात मी त्यांना माझे रूग्णतः कालावधीतील काढण्यात न आलेले वेतन फरक काढल्याचे मोबदल्यात माझेकडे लाचेची मागणी होत असले बाबत व संबंधीत लोकसेवक यांची दिनांक 26/11/2020 रोजी भेट घेणार असल्याचे सांगितले. त्यावेळी पोलीस उप अधिक्षक श्री. खेडकर यांनी आज दिनांक 26/11/2020 रोजी सकाळी 10.00 वा. त्यांचे कार्यालयात लाचेच्या रकमेसह हजर रहाणे बाबत सुचना दिली. त्याप्रमाणे मी आज रोजी त्यांच्या कार्यालयात हजर झालो. पोलीस उप अधिक्षक श्री. खेडकर यांनी माझी कार्यालयात हजर असलेले पंच साक्षीदार व स्टाफ यांच्याशी आपसात ओळख करून दिली. त्यानंतर पोउपअधि. श्री.खेडकर यांचे सुचने प्रमाणे पंचानी माझी तक्रार विचारता मी माझी तक्रार तोंडी कथन केली ती, मी दिनांक 01/09/2014 ते 16/01/2015 या कालावधीत आजारी असल्याने रूग्णतः रजेवर होतो. माझे रूग्णतः रजेच्या कालावधीतील वेतन काढण्यात आले नाही. ते वेतन मिळण्यासाठी मी मा.जिल्हा हिवताप अधिकारी जिल्हा हिवताप कार्यालय,अहमदनगर यांना विनंती अर्ज मागील वर्षात समक्ष भेटुन दिला. त्याप्रमाणे माझे वरील रूग्णताः कालावधील वेतन 1,39,000/- रूपये काढण्यात येवुन ते माझे एस.बी.आय. शाखा संगमनेर बन्केच्या खात्यावर दिनंाक 19/11/2020 रोजी जमा झाले आहे. मला काल दिनांक 25/11/2020 रोजी जिल्हा हिवताप अधिकारी अहमदन/09/2014 ते 16/01/2015 दरम्याण आजार पणाचे कालावधी मधील काढण्यात न आलेले वेतन फरक 1,39,000/- रूपये काढल्याचे मोबदल्यात माझेकडे आज दिनांक 26/11/2020 रोजी मी दिलेल्या लाच मागणी तक्रारीचे अनुषंघाने करण्यात आलेल्या लाचमागणी पडताळणी कारवाई दरम्याण काढलेल्या वेतन फरक रक्कमेच्या 60 टक्के एवढी रक्कम लाच म्हणुन पंचासमक्ष मागणी करून, त्याप्रमाणे 80,000/- रूपये लाचेची रक्कम दिनांक 26/11/2020 रोजी आयोजित सापळा कारवाई दरम्याण पंचा समक्ष 17/33 वा. सुमारास स्विकारून स्वतःचा सांपत्तीक फायदा करून घेवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले. म्हणुन माझी लोकसेविका डॉ.श्रीमती रजनी रामदास

खुणे वय 57 वर्ष, धंदा नोकरी, जिल्हा हिवताप अधिकारी अहमदनगर यांचे विरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Harun papamiya Mulani(I (Inspector)) / PI **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अंमलदार
तोफखाना पोलीस स्टेशन
अहमदनगर

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**
**Name (नाव):** Harun papamiya Mulani
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI